अंबरनाथ नगरपरिषदेचे कै.बी.जी.छाया रुग्णालय, या रुग्णालयाचे सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरण झाल्यानंतर सदर रुग्णालयासाठी नवीन पदनिर्मिती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः अंनप २०११ / प्रक्र- १२९ /आरोग्य ३(अ)
गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, १० वा मजला, ए विंग,
एल.टी.मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: २१ मे,२०१८.

वाचा -

१) **शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांकः एमयुपी-२०१६/प्रक्र-३०९/नवि-१९ दिनांक-१७ नोव्हेंबर, २०१६.**

२) **सहसंचालक,आरोग्य सेवा (रुग्णालये-राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे /कक्ष-३/ टे३अ/डॉ.बी.जी.छाया.रु/पदनिर्मितीप्रस्ताव/३४०२५-२६/१७,दिनांक- ४ ऑक्टोबर,२०१७.**

प्रस्तावना :-

मा. मंत्रीमंडळाच्या दि.१८ ऑक्टोबर,२०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयास अनुसरुन तसेच नगर विकास विभागाच्या संदर्भाधिन शासन निर्णयान्वये अंबरनाथ नगरपरिषदेचे कै.बी.जी.छाया रुग्णालय या विभागाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय झाला. प्रस्तुत निर्णयामध्ये खालील अटी व शर्ती नमूद करण्यात आल्या आहेत.

१) अंबरनाथ नगरपरिषदेचे कै.बी.जी.छाया रुग्णालय या रुग्णालयाचा मालकी हक्क, संबंधित भूखंड व त्यावरील इमारती आणि त्यामधील यंत्रसामुग्रीसह (आर्थिक दायित्व वा बोजाविरहित) राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) कै.बी.जी.छाया रुग्णालयामधील १७ वैद्यकीय अधिकारी/ कर्मचारी यांचे शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडील समावेशन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) सदर रुग्णालयातील वैद्यकीयेत्तर (Non-Medical Staff) कर्मचा-यांच्या सेवा नगरपरिषदेच्या अन्य प्रयोजनार्थ उपयोगात आणता येत असल्यामुळे अशा कर्मचा-यांना नगरपालिकेच्या सेवेत समाविष्ट होण्याच्या विकल्प देण्यास मान्यता येत आहे.

४) हस्तांतरणाच्या अनुषंगाने कर्मचा-यांच्या समावेशनाबाबत विकल्प मागवून पुढील कार्यवाही करणे या करिता ६ महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता असल्याने, त्याबाबतची कार्यवाही सार्वजनिक आरोग्य विभागाने ६ महिन्यात करावी. त्यानुषंगाने ६ महिन्यापर्यंत वेतनाची अदायगी नगरपरिषदेने करण्यास व ६ महिन्यानंतर वेतनाची अदायगी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) हस्तांतरणानंतर सदर रुग्णालयावरील संपूर्ण खर्च सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यास व त्यासाठी आवश्यक ती अर्थसंकल्पीय तरतूद (वार्षिक रुपये २.५० कोटी आवर्ती) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६) रुग्णालयाचे शासनाकडे हस्तांतरण झाल्यानंतर त्या अनुषंगाने नगरपरिषदेकडील जेवढा कर्मचारी वृंद शासनाकडे वर्ग होईल त्या प्रमाणात, त्याअनुषंगाने नगर परिषदेला अनुज्ञेय सहायक अनुदानाची पुनर्रचना करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७) सदर रुग्णालयाच्या हस्तांतरणाबातची कार्यवाही विहीत कालावधीत होण्यासाठी विशेषत: कर्मचारीवृदांचे सार्वजनिक आरोग्य विभागाकडे समावेशन करण्याकरीता क्षेत्रीय स्तरावर व्दिसदस्यीय समिती पुढील प्रमाणे स्थापित करण्यात येत आहे.

१) जिल्हा प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जि. ठाणे
२) सार्वजनिक आरोग्य विभागाने नामनिर्देशित केलेल्या क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी.

८) मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद हे या समितीस आवश्यक ती सर्व माहिती देतील. हस्तांतरणाबाबतची सर्व कार्यवाही व कर्मचारीवृंदाबाबत समावेशनाची कार्यवाही करण्याबाबत ही समिती समन्वयन करेल व आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकरणाकडे २ महिन्याच्या आत अहवाल सादर करेल.

२. मा.मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार तसेच नगर विकास विभागाच्या उपरोक्त शासन निर्णयानुसार अंबरनाथ नगरपरिषदेच्या कै.बी.जी.छाया रुग्णालयाच्या हस्तांतरणाच्या कार्यवाहीकरीता नेमण्यात आलेल्या समितीमध्ये उपसंचालक, आरोग्य सेवा,मुंबई मंडळ ठाणे यांचे नामनिर्देशन करण्यात आले होते. सदर रुग्णालयाची जागा व इमारत यांचे मालमत्ता विवरणपत्रावर सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरण करण्याची कार्यवाही सुरु आहे. विभागाच्या दिनांक २३ डिसेंबर २००२ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील जिल्हा / सामान्य रुग्णांलयाकरिता कर्मचारी वर्गाचा आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार सदर रुग्णालयासाठी नव्याने निर्माण करावयाच्या पदांचा प्रस्ताव सह संचालक आरोग्य सेवा यांच्या दि.०४.१०.२०१७ च्या पत्रान्वये प्राप्त झाला होता.

३. सह संचालक आरोग्य सेवा यांच्या दि. ४/१०/२०१७ रोजीच्या प्रस्तावास अनूसरून उच्च स्तरीय सचिव समितीने दि.१६.१.२०१८ रोजीच्या बैठकीत आणि दि. १८.०४.२०१८ रोजीच्या बैठकीत पदनिर्मितीस मान्यता दिली असुन सदर मान्यतेस अनुसरुन कै. बी.जी छाया रुग्णालय (६५ खाटा) आरोग्य विभागाच्या ताब्यात घेऊन पदनिर्मिती करण्याचा प्रस्ताव तसेच रुग्णालयाला मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता या संदर्भात पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

अंबरनाथ परिसरातील रुग्णांना अखंडीत रुग्णसेवा देण्यासाठी अंबरनाथ नगरपरिषदेचे कै.बी.जी.छाया रुग्णालय (६५ खाटांचे) ताब्यात घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर रुग्णालयास ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यास मान्यता देत आहे. सदर रुग्णालय यापुढे कै.बी.जी.छाया उपजिल्हा रुग्णालय, अंबरनाथ म्हणून कार्यान्वित राहील. सदर रुग्णालयासाठी ५० खाटांच्या निकषा- नूसार २३ नियमित पदे, २१ काल्पनिक कुशल पदे ४ काल्पनिक अकुशल पदे अशा एकुण ४८ पदांच्या निर्मितीस

मान्यता देण्यात येत आहे. सदरहू रुग्णालयाचा ताबा घेतल्याच्या दिनांकापासून या रुग्णालयातील अधिकारी/कर्मचारी / यांना वेतन व भत्ते अनुज्ञेय राहतील. पदांबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी		पदसंख्या
अ	**नियमीत पदे**			
१	वैद्यकीय अधिक्षक	१५६००-३९१००	६६००	१
२	वैद्यकीय अधिकारी (शस्त्रक्रिया)	१५६००-३९१००	५४००	१
३	वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग प्रसुती तज्ञ)	१५६००-३९१००	५४००	१
४	वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण शास्त्रज्ञ)	१५६००-३९१००	५४००	१
५	वैद्यकीय अधिकारी (भिषक),	१५६००-३९१००	५४००	१
६	वैद्यकीय अधिकारी (बालरोग),	१५६००-३९१००	५४००	१
७	वैद्यकीय अधिकारी (अपघात कक्ष)	१५६००-३९१००	५४००	२
८	सहाय्यक अधिसेविका	९३००-३४८००	४४००	१
९	परिसेविका	९३००-३४८००	४३००	२
१०	अधिपरिचारिका	९३००-३४८००	४२००	५
११	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	९३००-३४८००	४२००	१
१२	औषध निर्माण अधिकारी	५२००-२०२००	२८००	२
१३	लेखापाल/ सहायक अधिक्षक	९३००-३४८००	४२००	१
१४	वरिष्ठ लिपिक	५२००-२०२००	२४००	१
१५	कनिष्ठ लिपिक	५२००-२०२००	१९००	१
१६	शस्त्रक्रियागृह परिचर	५२००-२०२००	१८००	१
	अ एकूण			**२३**
ब	**काल्पनिक कुशल पदे**			
१	अधिपरिचारिका	९३००-३४८००	४२००	७
२	क्ष-किरण तंत्रज्ञ	९३००-३४८००	४२००	१
३	औषध निर्माण अधिकारी	५२००-२०२००	२८००	१
४	प्रयोगशाळा सहाय्यक	५२००-२०२००	२०००	१
५	बाह्यरुग्ण सेवक	४४४०-७४४०	१३००	१
६	व्रणोपचारक	५२००-२०२००)	१८००	१
७	कनिष्ठ लिपिक	५२००-२०२००	१९००	१
८	रुग्णवाहिका चालक	५२००-२०२००	१९००	१

९	कक्षसेवक	४४४०-७४४०	१३००	५
१०	शिपाई	४४४०-७४४०	१३००	२
	ब एकूण			**२१**
क	**काल्पनिक अकुशल पदे (बाहय स्त्रोता व्दारे)**			
११	सफाईगार	४४४०-७४४०	१३००	२
१२	स्वयंपाकी	४४४०-७४४०	१३००	१
१३	पहारेकरी	४४४०-७४४०	१३००	१
	क एकूण			**४**
	एकूण अ+ब+क			**४८**

अंबरनाथ नगरपरिषदेचे कै.बी.जी.छाया रुग्णालयाची जागा इमारतीसह ताब्यात घेऊन, त्याबाबतचा सामंजस्य करार करण्याबाबतची कार्यवाही जिल्हा शल्य चिकीत्सक, ठाणे यांनी तात्काळ करावी.

सदर पदांच्या वेतनावरील खर्च खालील लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

<u>मागणी क्रमांक आर-१</u>

२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

(०१) नागरी आरोग्य सेवा - विषम चिकीत्सा

११०(७)- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना

(०६)(०१)-मुफसल क्षेत्रातील अध्यापन्नेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने

(२२१० ०२२६)

२. शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या पदांपैकी नियमित पदांच्या वेतनावरील खर्च (०१- वेतन), काल्पनिक कुशल पदावरील खर्च (१३-कार्यालयीन खर्च) व काल्पनिक अकुशल पदावरील खर्च (१०-कंत्राटी सेवा) या उपशीर्षाखाली करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदींमधुन भागविण्यात यावा.

३. या रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामावरील आवर्ती व अनावर्ती खर्च मागणी क्रमांक-एच-८, मुख्य लेखाशीर्ष ४२१० -वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य सेवा यावरील भांडवली खर्च, ०१ - नागरी आरोग्य सेवा , वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य सेवा यावरील भांडवली खर्च, ०१ नागरी आरोग्य सेवा, वैद्यकीय सहाय्य-पंचावार्षिक योजनांतर्गत योजना, इमारती, ११०-रुग्णालये व दवाखाने (१) (अ) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-इमारती, (००) (०१) मोठी बांधकामे (४२१० ००१४) ५३-मोठी बांधकामे या लेखाशीर्षाखाली टाकण्यात यावा व तो सन २०१८-१९ या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. वैद्यकीय अधीक्षक कै बी.जी छाया उपजिल्हा रुग्णालय अंबरनाथ यांना या शासन निर्णयान्वये “कार्यालय प्रमुख” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. कै.बी.जी.छाया उपजिल्हा रुग्णालयातून सार्वजनिक आरोग्य विभागात सामावून घ्यावयाच्या अधिकारी / कर्मचारी यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

६. उपरोक्त नमुद पदांपैकी तांत्रिक अकुशल पदांची कामे बाहययंत्रणेवदारे करुन घेताना शासन परिपत्रक, वित्त विभाग दिनांक २ फेब्रुवारी,२०१३ व व दिनांक २ डिसेंबर,२०१३ मधील तरतुदींचे पालन करावे.

७. सदर शासन निर्णय दिनांक दि १६.जानेवारी, २०१८ व दिनांक १८ एप्रिल,२०१८ रोजी झालेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०५१९१२२९५७७९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.05.21 17:42:02 +05'30'

(रा.शा.कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, (लेखा व लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र-१ / महाराष्ट्र-२ मुंबई नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (रूग्णालये-राज्यस्तर), मुंबई.
५. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), पुणे.
६. उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबइ मंडळ, ठाणे
७. जिल्हा शल्य चिकित्सक,ठाणे
८. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे.
९. जिल्हा प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे
१०. मुख्याधिकारी, अंबरनाथ नगर परिषद, अंबरनाथ, ,जि.ठाणे
११. वित्त विभाग (व्यय-१३/ विनियम/ वि.सु.-१, आ.पु.क. -१० प्रतीसह), मंत्रालय, मुंबई.
१२. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. सह सचिव / उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
१५. अवर सचिव (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग
१६. निवडनस्ती (आरोग्य-३अ).